# नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

वाचावे :- १) या कार्यालयाचे आदेश क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.६६/२०११/जा.९२०, दि.१६/११/२०११.
२) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, यलोगेट पोलिस ठाणे, मुंबई यांचा अहवाल दिनांक ०७/१२/२०११.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES HEAD OFFICE

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.६६/२०११/जा.9099
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई ४०० ०२०.
दिनांक :93/१२/२०११.

## आदेश शुध्दीपत्र

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

या कार्यालयाचे वाचावे क्र. १ अन्वये पारित केलेल्या आदेशातील आदेश क्र. १ मध्ये, "जप्त करण्यात आलेल्या अल हुसैनी बोटीमधील डिझेलचा संपुर्ण एकूण ३५ लिटर्स साठा, पारदर्शक ऑईलचा संपूर्ण एकूण ४००० लिटर साठा तसेच काळे तेलचा संपूर्ण एकूण २००० लिटर साठा शासनजमा करण्यात येत असून, सदर डिझेल, पारदर्शक ऑईल व काळे तेल या साठ्याची पोलीसांनी राज्य समन्वय तेल उद्योग, महाराष्ट्र राज्य, १०-पी, डि मेलो रोड, वाडीबंदर, मुंबई यांना देवून, त्यापोटी त्यांचेकडून प्राप्त होणारी रक्कम शासनजमा करावी" असे नमूद केलेले आहे.

वरिष्ठ पोलिस निरिक्षक, यलोगेट पोलिस ठाणे, मुंबई यांनी वाचावे क्र. २ अन्वये पाठविलेल्या अहवालात, जप्त करण्यात आलेला मुद्देमाल अल हुसैनी या बोटीत असल्याने राज्य समन्वय तेल उद्योग यांनी सदर जप्त साठा टँक लॉरीमध्ये आणण्याच्या सुचना दिल्या असून त्यानुसार पूर्तता करावयाचे झाल्यास त्यांच्याकडे कामगार तसेच टँक लॉरीच्या वाहतूकदारास अदा करावयाच्या रकमेचे तरतूद नाही. त्यामुळे त्यांनी सुधारीत आदेश निर्गमित करण्याची विनंती केली आहे.

सबब, सदर आदेशातील आदेश क्र. १ मध्ये या शुध्दीपत्रकानुसार सुधारणा करण्यात येत असून त्यामध्ये, "जप्त करण्यात आलेल्या अल हुसैनी बोटीमधील डिझेलचा संपुर्ण एकूण ३५ लिटर्स साठा, पारदर्शक ऑईलचा

संपूर्ण एकूण ४००० लिटर साठा तसेच काळे तेलचा संपूर्ण एकूण २००० लिटर साठा शासनजमा करण्यात येत असून, सदर डिझेल, पारदर्शक ऑईल व काळे तेल या साठ्याची पोलीसांनी वैध परवानाधारकांस प्रचलित बाजार दराने विक्री करुन, त्यापोटी त्यांचेकडून प्राप्त होणारी रक्कम शासनजमा करावी " असे वाचावे.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) मन्सूर अहमद इद्रिस देवळेकर, अल हुसैनी नावाच्या बोटीचे तांडेल
२) सलीम मोहम्मद अली खान, अल हुसैनी नावाच्या बोटीवरील खलाशी
३) राजू अमिद मंडल, अल हुसैनी नावाच्या बोटीवरील खलाशी
४) अमर सुरेंद्र पटनाईक, अल हुसैनी नावाच्या बोटीवरील खलाशी
५) अब्बास मुदक तरपदार, अल हुसैनी नावाच्या बोटीवरील खलाशी
६) अण्णाआपा सुब्रमण्यम स्वामी, अल हुसैनी नावाच्या बोटीवरील खलाशी
७) मुसा मुक्तार शेख, अल हुसैनी नावाच्या बोटीवरील खलाशी
८) राजू सोयलन विश्वास, अल हुसैनी नावाच्या बोटीवरील खलाशी
९) अल हुसैनी नावाच्या बोटीचे मालक
१०) हरिश जैस्वाल

(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, यलोगेट पोलिस स्टेशन, मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, यलोगेट पोलिस स्टेशन, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.
२) राज्य समन्वय तेल उद्योग, महाराष्ट्र राज्य, १०-पी, डि मेलो रोड, वाडीबंदर, मुंबई.
३) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.
४) निवड नस्ती.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.



0002